॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

### बातमी क्र.१

जळगाव दि. ७ () उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील महिला शिक्षक व महिला कर्मचाऱ्यांसाठी जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र व्यासपीठ निर्माण करुन देण्यासाठी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी पुढाकार घेतला असून उदया गुरुवार, दि.८ मार्च रोजी त्यानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठात काम करणाऱ्या महिलांसाठी स्वतंत्र व्यासपीठ नव्हते. त्यामुळे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी महिलांनी महिलांसाठी चालविलेले व्यासपीठ असावे यासाठी पुढाकार घेतला असून `उमवि मनस्विनी` हा ग्रुप महिलांनी स्थापन केला आहे. या ग्रुपचे तसेच या ग्रुपच्या लोगोचे अनावरण कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते उदया सकाळी १०.३० वाजता सिनेट सभागृहात होणार आहे. या निमित्त नाशिक येथील कुमुदिनी फेगडे यांचे `स्त्री शक्तीचा जागर` या विषयावर व्याख्यान देखील होणार आहे. यावेळी सौ.अनिता पाटील, सौ.श्रध्दा माहुलीकर, सौ.सुनिता पाटील, सौ.सुवर्णा कऱ्हाड, सौ.अर्चना चौधरी, डॉ.मंजुषा क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत.

---

### बातमी क्र.२

जळगाव दि. ७ (                ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतर्फे २३ व्या ओपन हाऊस `इन्फीनिटी- २०१८` या कार्यक्रमात आयोजित करण्यात आलेल्या व्यक्तीमत्व स्पर्धेत मोहित शहा हा विद्यार्थी मि.ओपन हाऊस आणि समृध्दी जकातदार ही मिस ओपन हाऊस ठरली.

या व्यक्तिमत्व स्पर्धेला उत्स्फुत प्रतिसाद लाभला. परीक्षक म्हणून आनंद मल्हारा, डॉ.शितल ओसवाल आणि डॉ.ए.के.गोस्वामी यांनी काम पाहिले. यावेळी विद्यार्थ्यांचे मानसिक, शारिरीक आणि बौध्दीक क्षमतांचे विविध स्तरातून विश्लेषण करण्यात आले. अखेर मोहित शहा आणि समृध्दी जकातदार यांना विजयी घोषित करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक प्रा.जे.बी.नाईक, समन्वयक डॉ.पी.डी.मेश्राम, डॉ.जी.ए.उस्मानी उपस्थित होते.

---

### बातमी क्र.३

जळगाव दि.७ (          ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात स्पीकमॅके अंतर्गत मंगळवार, दि.१३ मार्च रोजी सुप्रसिध्द बासरी वादक पं.रुपक कुलकर्णी यांच्या बासरी वादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

पं.रुपक कुलकर्णी यांनी पद्मविभूषण हरिप्रसाद चौरासिया यांच्याकडे शिक्षण घेतलेले असून इंग्लड, अमेरिका, जपान आणि चीन अशा विविध देशांमध्ये त्यांच्या बासरी वादनाचे कार्यक्रम झालेले आहेत. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांचा संगीताचा अल्बम प्रसिध्द झाला. त्यानंतर विविध संगीत कंपन्यांनी त्यांचे अल्बम काढले. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे. तानसेन समारोह, हरबल्लाह संगीत संमेलन, सवाई गंधर्व भिमसेन महोत्सव अशा नावाजलेल्या महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केलेली आहे. विद्यापीठाच्या सिनेट सभागृहात मंगळवार दि.१३ मार्च रोजी सकाळी ११वाजता त्यांच्या बासरी वादनाचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती समन्वयक डॉ.आर.बी.गोरे यांनी दिली.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ — दि. ७ मार्च, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी